# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 03/06/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग २ - रजा

4237

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/सुर्यवंशी/ /२०२० यवतमाळ ,दि. 3 JUN 2020

**<u>आदेश</u>**

श्रीमती सरिता सुर्यवंशी, कश्रेली हयांच्या मुलाचे लग्न असल्याने त्यांना **दि.२६/५/२०२० ते २४/६/२०२० पर्यंत एकुण ३०** दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेला आवक लिपीक या कार्यसनास अतिरीक्त कार्यभार श्रीमती साधना जिवने , कश्रेली कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

१. श्रीमती सरिता सुर्यवंशी क्कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्रीमती साधना जिवने कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक प्रबंधक.शाखा /डिपीजी लिपीक

क्रमांक :- सआली-5/प्रसुती रजा/2477,रूपाली/ 4231 /2020. यवतमाळ दिनांक : - 3 JUN 2020

## आदेश

**मपोशि/2477,रूपाली कुरमेलकर नेमणुक, पोलस मुख्यालय** यांना म.ना.से. रजा नियम 1981 मधील नियम 74 व शासन निर्णय क्र. अरजा-1409/प्र.क्र.08, सेवा-6, दिनांक 24/08/2009 अन्वये त्यांना रजेवर सोडल्याचे दिनांकापासुन 180 दिवस प्रसुती रजा मंजुर करण्यात येत आहे.

**(मा.पो.अ.यांच्या आदेशान्वये)**

3.6.

**(एम.एम.बागवान)**
**पोलीस उपअधिक्षक(मुख्या)**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ करिता**

प्रति,

पोनि-राखीव पोलीस निरीक्षक पो.मुख्यालय यवतमाळ /डिपीजी लिपीक यांना माहीतीस व योग्य कार्यवाही करीता.

प्रत,मपोशी/2477,रूपाली कुरमेलकर-नेमणुक-पो.मुख्यालय

क्रमांक-पोअय/ बालसंगोपन रजा/मपोशी/2089,मुजमुले/2020/ 4230 यवतमाळ दि.

- 3 JUN 2020

**आदेश**

मपोना/2089,कांचन मुजमुले, नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक.संकीर्ण -2017/प्र.क्र.25/सेवा-6 दि.23.7.2018 अवये शासकीय कर्मचारी यांनी रजेची मागणी केल्याने विनंतीवरुन 60 दिवस बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे .
**(मा.पो.अधि.यांचे आदेशान्वये)**

3.6.

(एम.एम.बागवान)
पोलीस उपअधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक यवतमाळ करिता

प्रति,
पोनि,पोस्टे -यवतमाळ शहर /डिपीजी लिपीक यांना माहीस व योग्य कार्यवाही करीता
प्रतः- मपोशी/2089,कांचन मुजमुले , नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर.

# भाग ४ - बक्षिस / मानधन

क्रमांक : पो.अ.य. / बक्षीस - मंजुर / 2020 / 4239 / यवतमाळ. दिनांक : - / 05 /2020

3 JUN 2020

**आदेश**

1, दिनांक 18/10/2019 रोजी पो. स्टे. वणी येथे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष मा. अमित शहा यांचे विधानसभा निवडणुक प्रचार कामी सभा बंदोबस्त मध्ये कॉलम क्र. 3 मधिल अधिकारी व कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त करुन कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यावस्थेचा प्रश्न निर्माण होउ दिला नाही व बंदोबस्त शांततेत पार पाडला.

त्याबाबत उल्लेखनीय कामगीरी केल्याने प्रोत्साहनपर खलील प्रमाणे बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम | कार्यालय | बक्षीस |
|---|---|---|---|
| 1 | सपोनी / सारंग बोम्पीलवार | दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ | रु.1000/- + सि. नोट |
| 2 | स. फौ. / 807, मो. शकील | दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ | रु. 500/- +जि.एस.टी |
| 3 | पोहवा-1724/ मुकेश बर्नेला | दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ | रु. 500/-+जि.एस.टी |
| 4 | मपोना- 503/ आरती मीश्रा | दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ | रु. 500/-+जि.एस.टी |
| 5 | पोशी - 128 / ईफराज काझी | दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ | रु. 500/-+जि.एस.टी |
| 6 | पोशी - 1326 / विजय मलमकार | दहशतवाद विरोधी कक्ष, यवतमाळ | रु. 500/-+जि.एस.टी |
| | | **एकुण रक्कम** | **रुपये 3,500 /-** |

प्रमाणीत करण्यात येते की, शासन निर्णय जी आर ओ-1305/प्र.क्र.509/पोल-1, दिनांक 07/05/2008 च्या परीशिष्ट ब मधिल अनुक्रमांक 16 ब मुंबई मॅन्युअल-1559, भाग-1 मधिल नियम 300 (1)(ई) मधील तत्वास अनूसरून बक्षीसाची रक्कम मंजुर करण्यात येत आहे.

( एम. राज कुमार )
पोलीस अधिक्षक. यवतमाळ.

**प्रति,**

बक्षीस लिपीक, (दोन प्रतीत) कार्यावाहीस.

**प्रत माहितीस व कार्यवाहीस,**

डीजीपी लिपीक, आस्थपना शाखा, पो. अ. कार्यालय, यवतमाळ.

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

3 JUN 2020

क्रमांक डीपी/३१-बी/पोशि-२३५३-२४२२ कुरसंगे/सेवाबाहय कार्यकाळ/ 4217 /२० यवतमाळ दि. /०५/२०२०

संदर्भ -१. क्र.डिपी/३१-बी/कादानो/पोशि-२३५३ कुरसंगे /कार्यकाळ/२९०२/२०२० यवतमाळ दि. ०९/०३/२०२०
२.आदेश क्र. डीपी/३१-बी/सेवामुक्त/कुरसंगे-यवतमाळ/२११/२०१६ दि. ५/११/२०१६
३.डिपी/३१-बी/पुनःस्थापीत/माजी नवप्रविष्ठ पोशि-२३५३(२४२२)/कुरसंगे/१३२४८/२०१६ यवतमाळ दि. ०१/१२/२०१६
४.आदेश क्र.डिपी/३१-बी/विचौ/नवपोशि(२३५३)२४२२ कुरसंगे/६८८९/१७ दि.१३/०७/२०१७

## आदेश

पोशि/२३५३ (२४२२) सत्यनारायण रामप्रसाद कुरसंगे नेमणुक पोलीस मुख्यालय,यवतमाळ यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक डिपी/३१-बी/सेवामुक्त/कुरसंगे/२०१४/१३७९२ यवतमाळ **दि. ०८/०८/२०१४** अन्वये ते पोलीस प्रशिक्षण केंद्र मरोळ येथे प्रशिक्षण घेत असतांना सतत गैरहजर राहत असल्याचे त्यांना मा. अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके म.रा.मुंबई यांनी त्यांचे ज्ञापन क्र.टिआरजी/३/बीटीसी/जिल्हा परत प्रशि/१९०/२११३/दिनांक ०४/०४/२०१३ अन्वये मुळ घटकामध्ये परत करण्यात आल्याने तेंव्हा नवप्रविष्ठ पोशि/२३५३ सत्यनारायण कुरसंगे यांना सेवेची आवश्यकता नसल्याने महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग -१ मधील नियम क्र. ७८(८)मधील टिप अन्वये सेवा तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असल्याने त्यांना पोलीस दलाचे सेवेतून **सेवामुक्त (Discharge)** करण्यात आले होते.

मा. अपर पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/१३/२२/१२/(कुरसंगे-यवतमाळ)/२११/२०१६ दि ०५/११/२०१६ अन्वये त्यांना पोलीस दलाचे सेवेतून सेवामुक्त (Discharge ) या शिक्षेचे आदेश बाजूस सारुन त्यांना हजर **सेवेत पुनःस्थापीत करुन** त्यांचे विरुध्द प्रस्तुत कसूरी प्रकरणी विभागीय चौकशी आदेशित करण्याचे आदेश दिले होते त्यावरुन या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/पुनःस्थापीत/माजी नवप्रविष्ठ पोशि-२३५३(२४२२)/कुरसंगे/१३२४८/२०१६ यवतमाळ **दि. ०१/१२/२०१६ अन्वये सेवेत पुनःस्थापीत** नंतर नवीन ब.क्र. २४२२ देण्यात येवून पो.मु.यवतमाळ येथे नेमणुक करण्यात आली आहे व संदर्भ क्र. ४ नुसार वि.चौ. आदेशीत करुन त्यांना वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता (परिणामकारक स्थगीतीची शिक्षा देण्यात आलेले आहे.

परंतू नवप्रविष्ठ पोशि-२४२२ सत्यनारायण कुरसंगे हे पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे **दिनांक ११/०३/२०१७ रोजी रुजू झाल्याने तेंव्हा पासून सेवेत पुनःस्थापीत करण्यात आले आहे**. सदर पोशि यांनी दि. ०८/०८/२०१४ ते ११/०३/२०१७पर्यंत सेवाबाहय कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ म्हणून गणण्याबाबत विनंती केल्याने त्यांना कार्यालयाचे आदेश दि. ०९/०३/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस पाठवून नोटीसला मुदतीचे आत स्पष्टीकरण सादर केल्यानंतर **पोशि-२४२२ सत्यनारायण कुरसंगे यांचा सेवाबाहय कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने ) नियम १९८१ च्या नियम क्र. ७१ (१)(२) नुसार खालील प्रमाणे ठरविण्यात येत आहे.**

१. दिनांक ०८/०८/२०१४ ते १०/०३/२०१७ पर्यंतचा सेवाबाहय कालावधी त्यांचे वेतनाच्या ५० टक्के वेतन देवून नियमीत करण्यात येत आहे.
२. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ च्या ७० नुसार सदरचा सेवाबाहय कालावधी हा निवृत्ती वेतनाच्या प्रयोजनासाठी ग्राहय राहणार नाही.

( एम. राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

पोशि/२४२२ सत्यनारायण रामप्रसाद कुरसंगे
पो.मु. यवतमाळ.

मार्फत - राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.